# दागिना

लग्नाचा सिझन. माझ्या अडीच वर्षाच्या मुलीला घेऊन मी एका लग्नात गेले होते. सर्व जणी खूप दिवसांनी भेटलो. गप्पांना अगदी ऊत आला होता. इतक्यात माझी छोटी मुलगी येऊन मला म्हणाली, "आई, माझा दागिन्यांचा डबा कुठे आहे?" सगळ्याजणी का हसल्या हे तिला समजले नाही. पण प्रत्येकीलाच 'दागिने' किती हवे असतात नाही?

अगदी प्राचीन काळातही उत्खननात दागिन्यांचे अवशेष सापडतात. दागिना म्हटले की आधी सोन्याचा आठवतो. पण हिऱ्याचे, मोत्याचे, चांदीचे, प्लॅटिनमचे, लाख, काच, मणी, स्टील, बेंटेक्स,.... वनातही सर्व दागिन्यांचा त्याग केलेली सीता फुलांचे दागिने घालतच होती!

'एक नूर आदमी दस नूर कपडा' म्हणत असले तरीही दागिन्यांनी रूपाला, व्यक्तिमत्त्वाला वेगळीच शोभा येते. स्त्रीयांच्या रूपाचे वर्णन करताना दागिन्यांचा उल्लेख हमखास होतो. कितीतरी गाण्यांचे उदाहरण देता येईल- 'तेरी बिंदिया रे --", "नाकात वाकडा, नथीचा आकडा", "झुमका गिरा रे", "छम छम बाजे रे पायलिया", "कुडी माझी सांडली ग." "पायी साखळ्यांचा भार, गळा मोतियांचा हार, मंगळसूत्र, ठुशी, सरी, विरुद्या जोडवी हो, आज लक्ष्मी हो चरण दाखवी -

आपल्याला देवाचे दर्शनही सालंकृत असलेले आवडते. पंढरपूरच्या विठोबा, तुळजाभवानी, अंबाबाई, वणीची देवी, उत्तमोत्तम हिऱ्या-मोत्यांचे माणकांचे दागिने देवाला वाहिलेले आहेत. बालाजी हा तर दागिन्यांनी मढलेला देव. किती प्रकारचे दागिने! कन्याकुमारी देवीच्या नाकातली नथीचा हिरा तर इतका तेजस्वी आहे की डोळे दिपून जातात. अगदी स्मशानात राहणारा देव महादेव सुद्धा, गळ्यात, हातात, दंडावर रुद्राक्षाच्या माळा असतात. आपल्या आरत्यांत बघा — रत्नखचित करा तूज गौरीकुमरा, हिरेजडित मुकुट शोभतो बरा.

Page No: ____
DATE: / /

कानी कुडल्यांची प्रभा, चंद्र सूर्य जैसे नभा.

माणसाच्या जीवनातही काही दागिन्यांचे विशिष्ठ स्थान आहे- अंगठी म्हणजे साखरपुडा. रामाने सीतेला हनुमंताजवळ अंगठीच पाठविली होती - ओळखीची खूण म्हणून! दुष्यंताने शकुंतलेला प्रेमाची खूण अंगठीच दिली होती! लग्नात मंगळसूत्राला महत्व. तर राज्याभिषेक म्हणजे मुकुटच हवा. राजा खुश झाला की गळ्यातला हार / मौक्तिक माळा काढून देणार! अगदी लहानपणीच्या गोष्टींच्या पुस्तकात राजकन्येचा चंद्रहारच चोरीला जायचा! कुठलातरी राजपुत्र मग तो शोधायचा. मंगळसूत्र, जोडवी हे सौभाग्याचे लक्षण. तर नवस बोललेला असेल तर पायात तोडाच घालतात! देवाला, माणसांनाच काय पण छोट्या बाहुलीलाही दागिने घालतात!

दागिन्यांवरून अनेक म्हणी / वाक्प्रचार आढळतात- उदा. लंकेची पार्वती असणे, गाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा, हातच्या कंकणाला आरसा कशाला, गळ्यातला ताईत असणे, नथीतून तीर मारणे, नाकापेक्षा मोती जड असणे. सूज्ञ, रसिक वाचकांनी अजून आठवावेत.

दागिना आवडत नाही अशी स्त्री शोधूनही सापडणार नाही. काळानुरूप स्त्री बदलली. दागिने बदलले, आवड व गरज बदलली. आकार, प्रकार बदलले. सध्या ऑक्साइड दागिन्यांची चलती आहे!

बाजारात भरपूर दागिने असतात पण आपल्याला काय शोभेल हे कळायला हवे. खूप दागिने म्हणजे खूप सुंदर असे नाही. अगदी मोजकेच पण आपल्याला शोभेल असे दागिने घातलेली ललना किती छान, मोहक दिसते! आता मैत्रिणींनो नवरात्रात छान छान साड्या, मोजकेच दागिने घालून देवी दर्शनाला जायचंय, खरं ना!



— सौ. वसुंधरा कुलकर्णी,
प्रजावक टाऊनशिप, कोथरूड.
मोबा- 9689135255